# मेट्रो ३ : मुंबईच्या भूगर्भातील ४० टक्के भुयाराचे काम पूर्ण

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गिकेदरम्यान सध्या १७ टीबीएम कार्यरत असून एकूण ५२ किमीपैकी २० किमीचे काम पूर्ण करण्यात एमएमआरसीएलला यश आले आहे. त्यामुळे जवळपास भूगर्भातील ४० टक्के भुयाराचे काम पूर्ण करण्यात आल्याची माहिती एमएमआरसीएलचे संचालक एस. गुप्ता यांनी दिली आहे. बुधवारी सायंकाळी ४ च्या सुमारास पाली मैदान ते आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंतचे भुयारीकरण ३१८ दिवसांत पूर्ण करून वैनगंगा ३ हे टीबीएम भुयारातून बाहेर पडले. पाली मैदान ते आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंतच्या १.१३ किमीचे भुयारीकरणासाठी १५० अभियंते, तंत्रज्ञ, आणि कुशल कामगार यांच्या मेहनतीमुळे पॅकेज ७ मधील काम पूर्ण करण्यात आले आहे.

वैनगंगा ३ या टीबीएमच्या माध्यमातून वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मेट्रो १ आणि सहार उन्नत मार्ग यांच्या खालून भुयारीकरण करण्यात आले आहे. तर भविष्यात मेट्रो ३चे पॅकेज ७ मरोळ नाका येथे मेट्रो १ आणि जेव्हीएलआर येथे प्रस्तावित स्वामी समर्थ नगर-जोगेश्वरी-कांजूरमार्ग-विक्रोळी मेट्रो ६ यांना जोडणार आहे. तसेच मुंबई उपनगरीय रेल्वे सेवेने न जोडली गेलेली एमआयडीसी, सीप्झ यांसारखी औद्योगिक आणि रोजगार केंद्रे जोडणार आहेत. पॅकेज ७ मधील ५० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले असून पॅकेज ७ चे काम एल ॲण्ड टी आणि शांघाय टनेल इंजिनीअरिंग कंपनीच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

मेट्रो ३ ही दक्षिण मुंबईतील मुंबई सेंट्रल, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व चर्चगेट रेल्वे स्थानकाला जोडणार असल्याचेही संचालक गुप्ता यांनी या वेळी स्पष्ट केले, तर मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने अनेक आव्हानांना समर्थपणे तोंड देत यशाचा आणखी एक टप्पा गाठला असून मेट्रो ३ मार्गिका मेट्रो १ आणि प्रस्तावित मेट्रो ६ मार्गिकेला जोडली जाणार असल्याचे व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी स्पष्ट केले.

(छाया : दीपक साळवी)

## पाचव्या भुयाराचे टीबीएम यशस्वीरीत्या बाहेर



## पॅकेज ७ वैशिष्ट्ये

- बेसाल्ट, ब्रेशिया अशा प्रकारच्या कठीण खडकांना भेदण्याच्या कामाला वैनगंगा ३ या टीबीएमने २ एप्रिल २०१८ पासून सुरुवात
- हे टीबीएम शांघाय टनेलिंग इंजिनीयरिंग कंपनीकडून निर्मित
- ९२ मीटर लांबीचे टीबीएम ४.१२ मीटर वेगाने भुयारीकरणाचे काम करते
- डाऊन मार्गावर ९.३७ आरसीसी सिमेंट रिंग्जचा वापर